लोकमत पू. पान क्र. १

# दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक

## गुन्हे शाखेकडून सहा गुन्ह्यांची उकल



वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक केली आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** दुचाकी चोरणाऱ्या तीन आरोपींना वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या आरोपींकडून सहा गुन्ह्यांची उकल करून चोरीची १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी मंगळवारी दिली.

नाईकपाडा येथील शिवभीमनगर येथे राहणाऱ्या अन्वर कुरुश (२१) या तरुणाची ७० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली होती. त्याने ९ मार्चला रात्री मेजरवाडी येथील सलामत चिकन शॉपसमोर पार्किंग केली होती तेथून चोरट्याने ती चोरून नेली. या प्रकरणी वालीव पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता. वसई विरार परिसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिमंडळ-२ च्या पोलिस उपायुक्त यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले.

### सातीवलीतून जेरबंद

■ वालीवच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे शोधमोहीम राबवून सातीवली परिसरातून आरोपी रोहित राजेश सिंग, अनिल कपूर सिंग आणि मोहन हरजित सिंग यांना ताब्यात घेतले.

■ या आरोपींकडे पोलिसांनी सखोल चौकशी करून वसई, विरार आणि नालासोपारा परिसरातून चोरी केलेल्या १ रिक्षा आणि ५ दुचाकी असा एकूण ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. आरोपींकडून वालीव येथील ४, तुळींज येथील १ आणि पेल्हार येथील १ अशा ६ गुन्ह्यांची उकल केली आहे.

■ ही कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा श्रृंगी-चौगुले, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील, वालीवचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जयराज रणवरे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) सय्यद जिलानी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक सचिन सानप, हवालदार मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर आदींनी केली.

# वसई-विरार पालिकेने ३,५८९ बॅनर हटवले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच आचारसंहिता लागल्याने वसई-विरार महापालिकेने अनधिकृत बॅनर, पोस्टरवर कारवाई करत राजकीय पक्षांचे झेंडेही काढण्यात आले आहे. शहरातील ३,५८९ नेतेमंडळींच्या वाढदिवसाचे शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज, बॅनर तसेच कार्यक्रमांचे बॅनर लोकसभेची आचारसंहिता लागताच खाली उतरले आहेत.

शहराच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत झालेले ३०८४ बॅनर, पोस्टर्स मागील तीन दिवसांत उतरवण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने का होईना शहरांनी मोकळा श्वास घेतल्याचे दिसत आहे. आचारसंहितेपूर्वी शहरातील विविध भागांत राजकीय बॅनर मोठ्या प्रमाणात झळकले होते. शासन आपल्या दारी, नमो महारोजगार मेळावा, विविध स्वरूपाची भूमिपूजने, लोकार्पणे म्हणून लावण्यात आलेले बॅनर यामुळे शहर विद्रूप झाले होते.

### वीज खांबांवरही फलक

■ मनपाच्या माध्यमातून या अनधिकृत बॅनर, पोस्टरवर कोणत्याही स्वरूपाची कारवाई केली जात नव्हती. मुख्य रस्त्यांवरील विद्युत खांबांवरही फलक, झेंडे लावले जातात.

■ अशा प्रकारचे बॅनर, झेंडे लावण्यामध्ये राजकीय पक्षांचे पदाधिकारी आघाडीवर असल्याचे दिसून येतात.

■ अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी मनपाने शहरातील काही ठिकाणे निश्चित करून त्या ठिकाणी बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्याची योजना सुरु केली होती. यानंतरही शहरात बेकायदा बॅनर, पोस्टर लावण्याचे प्रकार सुरूच होते.

■ या कारवाईत १६ ते १८ मार्च दरम्यान ४९५ झेंडे, १,२५३ पोस्टर आणि १,८३१ बॅनर असे एकूण ३,५८९ इतके राजकीय पक्षांचे बॅनर, पोस्टर, झेंडे हटविल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस यांनी दिली आहे.

# नशेत पोहायला गेला; बुडून मृत्यू

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन येथील जुडीशियल अकॅडमीजवळ असलेल्या मरगाळी तलावात प्रमोद शंकर काकडे (४०) रा. मरगली पाडा, वृद्धाश्रमा शेजारी हा दारूच्या नशेत तलावात आंघोळीला आणि गाडी धुण्यास गेला होता. दारूच्या नशेत तलावात पोहताना तो बुडून मरण पावला. ही घटना सोमवारी घडली असून उत्तन पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. उत्तन पोलिस अधिक तपास करीत आहेत.

CamScanner

लोकमत पु. पान क्र. ३

# गाडी मागे घे सांगितले म्हणून मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : गाडी मागे घे सांगितले म्हणून रॉडने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याबाबत काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

वसईच्या कामणगाव भागात राहणारे मोहम्मद असरार मोहम्मद जाकीर शेख (२६) हे पिकअप गाडी चालक दहिसर हद्दीजवळ सिग्नल लागला म्हणून थांबला होता. त्यावेळी त्याच्या पिकअपसमोर जितेंद्र गौतम कुमार (४४, रा. पोईसर गाव, कांदिवली) हा डंपर उभा करून होता. त्याला गाडी मागे घे नाही तर थांब, असे सांगूनदेखील तो गाडी तशीच पुढे घेत होता. म्हणून गाडीचे काही नुकसान तर झाले नाही ना हे पाहण्यासाठी शेख खाली उतरून जितेंद्र याच्याशी बोलत होता. तेव्हा जितेंद्रने शिवीगाळ करून गाडीतून लोखंडी रॉडने शेख यांच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले.

# पतीने पत्नीच्या डोक्यात दारूच्या नशेत घातली खुर्ची

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : पतीने पत्नीच्या डोक्यात दारूच्या नशेत खुर्ची घातल्याची घटना मीरा रोडच्या पेणकरपाडा येथे घडली आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मीरा रोडच्या पेणकरपाडा, श्यामसुंदर चाळीत राहणाऱ्या पुष्पा विश्वकर्मा (३९) यांना तिचे पती विनोद सियाराम विश्वकर्मा (४३) याने दारू पिऊन आला व काही कारण नसताना शिवीगाळ करत प्लास्टिकची खुर्ची उचलून पत्नी पुष्पाच्या डोक्यात व उजव्या हातात मारली. त्यात पुष्पा यांच्या डोक्याला जखम झाली. काशीमीरा पोलिसांनी विनोदवर गुन्हा दाखल केला आहे.

# वीजचोरीप्रकरणी गुन्हा दाखल

पारोळ : भाईंदरच्या उत्तन धावगी मार्गावर संत जोसेफ शाळेजवळ राहणारा सँडी रॉड्रिक्स याने बेकायदेशीरपणे वीजचोरी केली म्हणून अदानी इलेक्ट्रिक सिटीचे वरिष्ठ अधिकारी तन्मय पाटील यांच्या फिर्यादीवरून उत्तन सागरी पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल केला आहे. २ लाख ३४ हजार रुपये किमतीची १३ हजार ६३३ युनिट वीजचोरी केल्याचे उघड झाले. सहायक फौजदार विनायक कवडे हे अधिक तपास करत आहेत.

CS CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र. ४

# बांगलादेशींच्या ताब्यातून दोघींची सुटका

## ▌भाईंदर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई



**▌मीरा रोड :** मीरा-भाईंदर व इतर ठिकाणी देहविक्रयासाठी मुली पुरवणाऱ्या बांगलादेशी दलालावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने कारवाई केली. शिवाय त्याच्या ताब्यातून दोन पीडित मुलींची सुटका केली आहे.

सुल्तान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल व त्याचे दोन साथीदार (सर्व रा. चार बंगला, वर्सोवा, अंधेरी प.) हे दलाल आहेत. ते देहविक्रयासाठी गिऱ्हाईकास मुंबई, ठाणे, काशिमीरा व मीरा-भाईंदर या परिसरातील लॉजमध्ये रूम बुक करण्यास सांगतात. त्यासाठी १५ हजार रुपये मोबदला घेत मुली पुरवित असल्याची माहिती भाईंदर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार पाहिजे आरोपी दलाल यांनी बोगस गिऱ्हाईक यांना सांगितल्याप्रमाणे ठाकुर मॉलसमोर अजित पॅलेस हॉटेलच्या बाजूस असलेल्या फुटपाथवर, पेणकरपाडा, काशीमिरा येथे पाठवून सत्यता पडताळून छापा टाकला. यावेळी दोन पाहिजे आरोपी दलाल व त्यांचा साथीदार सुलतान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल (३८) यांनी आपसात संगनमत करून दोन पीडित मुलींना देहविक्रयासाठी वप्रवृत्त केले. त्यासाठीची रक्कम मो.आलमगीर उर्फ सुलतान मंडल याच्याकडून स्वीकारली.

तसेच ताब्यातील आरोपी मो. आलमगीर उर्फ सुलतान मंडल हा पारपत्र व व्हिसाशिवाय भारतात बेकायदा प्रवेश करून वर्सोवा येथे चार महिन्यांपासून राहत असल्याचे समजले. मुद्देमालासह ताब्यात घेऊन दोन पीडित मुलींची सुटका पथकाने केली. दोन पाहिजे आरोपी दलाल व ताब्यातील दलाल सुलतान उर्फ मोहम्मद आलमगिर अब्दुल मोजीत मंडल यांच्याविरुद्ध काशीमिरा पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी पान क्र. ८

# व्यापाऱ्याची फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक

## ६ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त



**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

व्यापाऱ्याचा विश्वास संपादन करुन व्यापाऱ्याकडून स्टेशनरीचा मालाची ऑर्डर देऊन खरेदी केलेल्या मालाचे पैसे न देता आर्थिक फसवणुक करणाऱ्या दोघांना वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे.राजन ऊर्फ मनोज रामलाल सोनार ( ४३ ) व तेजस सतीश पाटील ( ३१ )अशी त्यांची नावे असून त्यांच्याकडून ६ लाख २८ हजार ७७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अब्दुल्ला मोहम्मद युसुफ शेख यांची कार्यालयीन स्टेशनरी उत्पादन करणारी कंपनी आहे. या कंपनीला आरोपीनी बॉक्स फाईलची ऑर्डर देऊन शेख यांच्याकडून दोन टप्प्यात १८६८ बॉक्स फाईल व ३०० फाईल असा एकुण १ लाख ४८ हजार ७७० रुपये किंमतीचा स्टेशनरी माल खरेदी केला. त्यानंतर शेख यांना आरोपीनी पुढील तारखेच्या धनादेशाद्वारे मालाची रक्कम देण्याचे सांगितले. दिरम्यान शेख यांना न वटणारे परंतु पुढील तारखेचे धनादेश त्याने दिले. त्यापोटी शेख यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून आरोपीना स्टेशनरी मालाचा पुरवठा केला.तसेच आरोपीनी खरेदी केलेल्या मालाचे पैसे न देता माल घेऊन शेख यांची आर्थिक फसवणुक केली. त्यामुळे फिर्यादी अब्दुल्ला मोहम्मद युसुफ शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

या गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपीची माहीती काढून भाईदर व मिरारोड परीसरात शोध घेतला. राजन ऊर्फ मनोज रामलाल सोनार ( ४३ ) व तेजस सतीश पाटील ( ३१ ) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

CamScanner

पुढारी पान क्र. ५


# जोशी रुग्णालयातील शवागार होणार अपग्रेड

## नवीन ९ शवपेट्यांसह व्हिसेरा, डीएनए स्टोअर रूमची सुविधा उपलब्ध होणार

**भाईंदर : राजू काळे**

भाईंदर येथील भारतरत्न स्व. पंडीत भीमसेन जोशी रुग्णालयातील शवागारात अत्याधुनिक सुविधा देण्यास आरोग्य विभागाने नुकतीच मंजुरी दिली आहे. त्यानुसार या शवागारात ९ नवीन शवपेट्यांसह व्हिसेरा, डीएनए, हिस्टोपॅथोलॉजी स्टोअर रूमची सुविधा प्राप्त होणार असून शवविच्छेदनासाठी हायड्रॉलिक ट्रॉलीची देखील सुविधा प्राप्त होणार असल्याने प्रथमच हे शवागार अपग्रेड होणार असल्याचे सूत्राकडून सांगण्यात आले.

कोव्हीड महामारीत जोशी रुग्णालयाचा शहराला मोठा आधार ठरला असतानाच सध्या हे रुग्णालय अपग्रेडच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे दिसून आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेला काही महिन्यांपूर्वी



सुरुवात करण्यात आली. आता तर त्यात कॅथलॅब सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे कॅन्सर रुग्णांना दिलासा मिळाला असला तरी हि कॅथलॅब सुरु होण्यास किमान एक वर्षांचा कालावधी लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच पालिकेने या रुग्णालयात जिल्हापरिषदेच्या काळापासून एका लहान खोलीत सुरु असलेले शवविच्छेदन केंद्र सुसज्ज पद्धतीने बांधले. त्यात एकूण २१ शवपेट्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यात मृतदेह ठेवण्यासाठी पालिकेकडून माफक शुल्क आकारले जात असल्याने सामान्य लोकांना ते परवडणारे ठरले. त्याचा वापर नियमितपणे होत असतानाच त्यातील १२ शवपेट्या एक वर्षांपूर्वी नादुरुस्त झाल्या. त्यातच मीरारोडच्या भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालयातील शवागार पालिकेकडून बंद करण्यात आल्याने त्याचा भार जोशी रुग्णालयातील शवागारावर पडू लागला. मात्र या शवागारातील १२ शवपेट्यांच्या नादुरुस्तीमुळे त्यात मृतदेह ठेवण्यास सामान्य लोकांना अडचण निर्माण होऊ लागल्याने त्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये मृतदेह ठेवण्यासाठी जास्त रक्कम मोजावी लागत होती. त्यामुळे शवागारात नवीन शवपेट्या बसविण्याची मागणी रुग्णालय प्रशासनाकडून जिल्हा आरोग्य विभागाकडे केली. अखेर एक वर्षानंतर या शवागारासाठी १२ ऐवजी ९ नवीन शवपेट्या मंजूर करण्यात आल्या. यामुळे या शवागारात पूर्वीप्रमाणेच मृतदेह ठेवण्याची सुविधा मोफत उपलब्ध होणार आहे. तर शवच्छेदनासाठी या शवागारात असलेल्या दोन शवविच्छेदन टेबलवर तसेच शवपेट्यांमध्ये मृतदेह ठेवण्यापासून ते मृतदेह बाहेर काढण्यासाठी १ हायड्रॉलिक ट्रॉली देखील मंजूर करण्यात आली आहे. यामुळे शवविच्छेदनावेळी मृतदेहाची हेळसांड बंद होणार आहे.

"कोणत्याही रुग्णालयातील शवागारात काम करणे तेथील कर्मचाऱ्यांसाठी नापसंतीची बाब असते. त्यामुळे या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सोईसुविधा उपलब्ध करून दिल्यास तो तेथे चांगले काम करून शकतो. त्याच पार्श्वभूमीवर जोशी रुग्णालयातील शवागारातील सर्व जुनाट वस्तूंच्या ठिकाणी नवीन वस्तू बसवून त्याला अद्यावतरित्या सुशोभित केले जात आहे. तसेच मृतदेहाचे शवविच्छेदनावेळी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी काही अद्यावत यंत्रणा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जेणेकरून येथील वातावरण तणावाऐवजी तणावमुक्त राहील, असा प्रयत्न केला जात आहे.

**- डॉ. जाफर तडवी,**
रुग्णालय अधिक्षक

# ऑनलाईन गमावलेले ५ लाख मिळवून दिले परत

**मिरारोड :** विरार परिसरात एका महिलेची ऑनलाईन इन्वेस्टमेंट दरम्यान ८,०२,८०० रुपयाची फसवणूक केली होती. त्या महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर सायबर गुन्हे शाखेने तपास करून ऑनलाईन फसवणूक झालेल्या रकमेपैकी ५ लाख रुपये परत मिळवून दिले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विरार परिसरातील श्रीमती. दलाल यांची ऑनलाईन इन्वेस्टमेंट दरम्यान ८,०२,८०० रुपयाची फसवणूक केल्याबाबत सायबर पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. हे सर्व व्यवहार वेगवेगळ्या बँकेच्या खात्यावर गेल्याचे दिसून आले. तात्काळ तक्रारदार यांची फसवणूक रक्कमेबाबत संबंधीत बँकेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करून व सातत्यपूर्ण पाठपुरावा करून फसवणूक रक्कम थांबविण्यात आली.

CamScanner

पुढारी पू. पान क्र. ३

## दुचाकी चोरणारा आरोपी जेरबंद

**पालघर :** वसई विरार-मीरा भाईंदर आयुक्तालयाच्या विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये विविध ठिकाणी दुचाकी चोरणाऱ्या दुचाकी चोराला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून चार दुचाकी जप्त केल्या आहेत. विरार विवा तारांगण येथील वीस वर्षे तरुणाची एक मार्च रोजी विजेवर चालणारी दुचाकी चोरीला गेली होती. १२ मार्च रोजी विरारला गुन्हा दाखल करण्यात आला. विरारच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने ही बाब गांभीर्याने घेत शोध मोहीम राबवून महेश कंपली या बावीस वर्षीय संशयित तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून अधिकची चौकशी केली असता विविध कंपनीच्या दोन लाख रुपयांच्या जवळपासच्या दुचाकी त्याने चोरल्याची कबुली पोलिसांना दिली. या चोराने विरार येथून दोन, तुळींज येथून एक, नारपोली येथून एक अशा चार गुन्ह्यांमधील दुचाकी चोरल्या होत्या.

## दारूच्या नशेत इसमाची आत्महत्या

**पालघर :** मद्यपानाच्या नशेत आपल्या राहत्या घरात पन्नास वर्षीय मोहम्मद इकलाश शेख यांनी आत्महत्या केल्याचा प्रकार घडला आहे. जाबर पाडा पेल्हार येथे राहणारे शेख यांनी घरातील छताच्या लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेत हे आत्महत्या केली. पेल्हार पोलिसांनी या प्रकरणी रविवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## सख्ख्या बहिणींचे अपहरण

**पालघर :** तुळींज पोलीस ठाण्याच्या क्षेत्रातील मोरेगाव परिसरात दोन मुलींचे अपहरण केल्याची घटना घडली आहे. या दोन्ही मुली एकमेकांच्या बहिणी आहेत. आपल्या इमारत परिसरात खेळत असताना त्या अचानक गायब झाल्या व पुन्हा आल्या नसल्याने शोधाशोध सुरू झाली. मात्र त्या सापडल्या नाहीत. याप्रकरणी आईने अपहरण झाल्याचा तक्रार देत तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

## आजाराला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**पालघर :** आजारपणाला कंटाळून पंचवीस वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची घटना वालीव पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. प्रमोद मोरे असे तरुणाचे नाव असून तो बावशेतपाडा परिसरात राहत होता. त्याला कोणीतरी मारण्यासाठी येत असल्याची भीती सतवत होती असेही सांगितले जाते. वालीवच्या सुंदर नगर इमारतीच्या तिसऱ्या माळ्यावरून उडी मारून त्यांनी ही आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची या प्रकरणी नोंद केली आहे.

म. टा. पू. पान क्र. १

# दोन कोटींचा वाहनघोटाळा उघड

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

## सात जणांच्या टोळीला वसईत अटक

बँकेची बनावट एनओसी तयार करून कर्ज असलेल्या महागड्या चारचाकी परराज्यात विकणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला अटक करण्यात आचोळे पोलिसांना यश आले आहे. एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून दोन कोटी ३४ लाखांची वाहने आचोळे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी विविध राज्यांतून जप्त केला आहे.

पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी याबाबतची माहिती दिली. आचोळे रोड परिसरात राहणाऱ्या जगदीश माळी यांना, व्यवसायासाठी दोन कोटींचे कर्ज मंजूर करून देतो, असे सांगत एका परिचयाच्या व्यक्तीने विविध बँकांचे अर्ज भरून घेतले. मात्र त्याबदल्यात त्यांना कर्जाचे पैसे मिळाले नाहीत तर महागड्या चारचाकी गाड्या माळी यांच्या नावाने विविध बँकांतून मिळालेल्या कर्जाद्वारे खरेदी झाल्याचे माळी यांच्या लक्षात आले. या प्रकरणी पोलिसांना माहिती दिल्यानंतर आचोळे पोलीस ठाण्यात




गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना आंतरराज्य टोळी या कामात सक्रिय असल्याचे समोर आले आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी राहुल शहा असल्याचे कळताच पोलिसांनी त्याचा तपास सुरू केला होता.

राहुल हा पवईमध्ये असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. त्याच्याकडे वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर असलेली आठ सिमकार्ड, नेपाळचे एक सिमकार्ड, दोन लॅपटॉप, एक आयपॅड, नऊ मोबाइल, तीन बनावट आधारकार्ड आणि फेडरल व टीएनबी बँकेच्या बनावट एनओसी या गोष्टी सापडल्या. तसेच त्याने माळीच्या यांच्या नावावरील १२ महागड्या गाड्यांची विक्री परराज्यात केली आहे.

राहुल उर्फ सौरभ शहा याच्या टोळीमध्ये सहभागी असलेला विजय सिंग, भिकाजी उर्फ उमेश गोपाळे, मोहम्मद नजर खान, प्रवीण उर्फ राणू जैन, आकाश मुसळे आणि विवेक करंडे अशा एकूण सात जणांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन कोटी ३४ लाख ५३ हजार ३०२ रुपये किंमतीची १२ महागडी वाहने जप्त करण्यात आली असून अजूनही हे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त उमेश माने-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आचोळ्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलिस निरीक्षक (गुन्हे) विवेक सोनवणे, पोलिस निरीक्षक विजय चव्हाण, तपास पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक सुहास म्हात्रे यांच्यासह इतर पोलिसांनीही केली आहे.

CamScanner

सकाळ पृ. पान क्र. 1



## मनवेलपाड्यातील कार्यालयांविरोधात धडक कारवाई

विरार, ता. १९ (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेच्या 'ब' प्रभाग समितींतर्गत विरार मनवेलपाडा, नाना-नानी पार्क येथील रस्त्यात अनधिकृतपणे कंटेनर कार्यालयांवर मंगळवारी (ता. १९) धडक कारवाई करण्यात आली. महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे आणि प्रभारी सहायक आयुक्त संजीव पाटील यांनी पोलिस बंदोबस्तात कारवाई केली.

विरार पूर्वेकडील नाना-नानी पार्कसमोरील रस्त्यावर सुसज्ज कंटेनर कार्यालये थाटण्यात आली होती. त्यांनी नागरिकांचा रस्ता अडवल्याने अनेकदा पालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. कंटेनर कार्यालय राजकीय पक्षांशी संबंधित व्यक्तींचे असल्याने अधिकारी कारवाई करण्यास धजावत नव्हते. या पार्श्वभूमीवर पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार आणि अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी कारवाईची माहिती दिली होती.

### नागरिकांमध्ये नाराजी

लोखंडी कंटेनर स्वरूपातील अनधिकृत कार्यालये व फूड ट्रक हटविण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिका आग्रही असताना वसई-विरार महापालिका मात्र बोटचेपी भूमिका घेत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला होता.

सकाळ पान क्र. 5

# भाजप-शिंदे गटात शीतयुद्ध

## ठाण्यात उमेदवारीसाठी मिरा-भाईंदरचे कार्यकर्ते आग्रही

भाईंदर, ता. १९ (बातमीदार) : लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपात ठाणे लोकसभा मतदारसंघ शिंदे गटाला देण्यात येणार असल्याची सध्या जोरदार चर्चा आहे. दोन्ही पक्षांमध्ये स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही जागा भाजपने सोडू नये, अशी ठाम भूमिका भाजप कार्यकर्त्यांनी घेतल्याने ठाणे लोकसभा मतदारसंघात नाराजीचे वारे वाहत आहेत.

ठाणे लोकसभेच्या सहा विधानसभा मतदारसंघांपैकी चार विधानसभा भाजपकडे आहेत. शिवाय मिरा-भाईंदरमध्येही भाजपचाच वरचष्मा आहे. २०१७ च्या निवडणुकीत महापालिकेत ९५ पैकी तब्बल ६१ जागा जिंकून भाजपने एकहाती सत्ता स्थापन केली होती. तेव्हापासून स्थानिक पातळीवर भाजप-शिवसेनेत वितुष्ट आहे. त्यातच २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत युती असतानाही शिवसैनिकांनी भाजपचे अधिकृत उमेदवार नरेंद्र मेहता यांना साथ दिली नव्हती. परिणामी, मेहता यांचा पराभव झाल्याचे शल्य मेहता यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. अशातच महायुतीच्या जागावाटपात ठाणे लोकसभा शिंदे गटाला देण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. यामुळे मिरा-भाईंदर भाजपमध्ये चांगलीच अस्वस्थता असून स्थानिक पातळीवर भाजप-शिंदे गटात दिलजमाई झालेली नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर ठाणे मतदार संघात शिंदे गटापुढे नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

### श्रेयवादावरून वाद

सध्या भाजपमध्येच गटबाजी असल्याने पक्षाचा एक मोठा गट त्यांच्यासोबत आहे. अशातच काही दिवसांपूर्वी भाजपचे माजी नगरसेवक अरविंद शेट्टी आणि शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांच्यात वादाची ठिणगी पडली. या वादात शेट्टी यांनी सरनाईक यांच्यावर आरोप केल्याने प्रत्युत्तर म्हणून शेट्टी यांच्या अनधिकृत बार-लॉजची यादी जाहीर केली होती. याव्यतिरिक्त स्थानिक पातळीवरही भाजपने केलेल्या कामाचे श्रेय शिंदे गट घेत असल्याने नाराजी आहे.

शिंदे गटाकडून भाजप कार्यकर्त्यांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे शिंदे गटासाठी काम करण्यास भाजप कार्यकर्ते तयार नाहीत. कार्यकर्त्यांची ही भावना वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवली आहे.

- नरेंद्र मेहता, माजी आमदार, भाजप

### कल्याणची उमेदवारी श्रीकांत शिंदेंनाच



श्रीकांत शिंदे

कल्याण लोकसभेत भाजपच्या कमळ चिन्हावर उमेदवार उभा करावा, अशी मागणी दिवा भाजपच्या कार्यकर्त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे. यावरून शिंदे गट आक्रमक झाला असून पदाधिकाऱ्यांनी कुवतीप्रमाणे वक्तव्य करावे, असा टोला लगावत भाजपला डिवचले आहे. स्वतःचे अस्तित्व दाखवण्यासाठी दिवा भाजप तथ्यहीन दावे करत असल्याचे मत शिवसेनेचे दिवा उपशहर प्रमुख ॲड. आदेश भगत यांनी केला आहे.

CamScanner

# वाहतूक पोलिसांना डावलून पालिकेचे जाहिरात फलक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला जाहिरात फलक लावताना वाहतूक पोलिसांकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) घेणे गरजेचे आहे. मात्र तसे न करता पालिका परस्पर जाहिरात फलकांना परवानगी देत आहेत. यामुळे नियोजनाअभावी वाहतुकीला अडथळा येत आहे. वाहतूक पोलिसांनी वसई-विरार महापालिकेला लेखी कळवूनही जाहिरात विभागाकडून कसलाही प्रतिसाद मिळत नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

वसई, विरार शहरात मागील ठिकठिकाणी जाहिरात फलक उभारण्यात येत आहेत. अनेक ठिकाणी लोखंडी कमानी उभारून जाहिराती लावल्या जात आहेत. या जाहिरातीचे व्यवस्थापन आता वसई-विरार महापालिकेच्या जाहिरात विभागाकडून करण्यात येत आहे. जाहिरात फलक लावण्याची परवानगी देऊन त्यातून जाहिरात कर पालिकेला मिळू लागला आहे. शहरात अनेक जाहिरातदार पालिकेकडून परवानगी मिळवून जाहिरात फलक लावू लागले आहेत. मात्र काही ठिकाणी जाहिरात फलक मुख्य रस्ते, वर्दळीच्या ठिकाणी लावले जात आहे. रस्त्यावरील जाहिरातीमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होऊ लागले आहेत. वाहतूक विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राकडे पाठ फिरविल्याने समस्या निर्माण होत असल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले आहे. शहरात वाहनांची संख्या बेसुमार वाढली आहे. वाहतूक नियमन करताना वाहतूक पोलिसांना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. जाहिरात विभागाने शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत चालावी यासाठी जाहिरात फलकांना परवानगी देताना वाहतूक विभागाचा ज्या रस्त्यावर फलक लावला जातो तो वाहतुकीला अडथळा ठरणार नाही ना याबाबत अहवाल घेऊन परवानगी द्यावी, असे वसई वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले आहे.

> **रस्त्यावर लावण्यात येत असलेल्या जाहिरातीमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहे . वाहतूक विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राकडे पालिकेने पाठ फिरविल्याने समस्या निर्माण होत आहे .**



## पत्राकडे पालिकेचे दुर्लक्ष

वसई परिमंडळ २ च्या वाहतूक विभागाने ना हरकत परवानगी बाबत पालिकेकडे पत्रव्यवहार केला आहे. परंतु पत्रव्यवहार करून नऊ महिने उलटून गेले तरीही अजूनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असे विभागाचे म्हणणे आहे.

## धोकादायक फलक

शहरात विविध संस्थेच्या जाहिराती, राजकीय पक्षाचे फलक, वाढदिवस फलक परवानगी न घेताच लावले जातात. अनेकदा फलक कार्यक्रम संपला तरी वर्षानुवर्षे तसेच असतात. रस्त्यालगत व दुभाजकांच्या खांबाला फलक लटकत असतात. यामुळे अपघातांची शक्यता असते. धोकादायक जाहिरात फलकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दैनिक यशोभूमि

# वाहन चोरी के आरोप में 3 गिरफ्तार



**वसई । प्रतिनिधि**

वालीव पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच टीम ने वाहन चोरी के आरोप में तीन लोगों को गिरफ्तार किया है। पुलिस ने उनके पास से 3 लाख से अधिक का माल भी जब्त किया है, इसके साथ ही 6 मामलों का खुलासा किया गया है। यह कार्रवाई डीसीपी पौर्णीमा चौघुले-श्रींगी व एसीपी उमेश माने-पाटील की टीम ने किया है। जानकारी के अनुसार पूर्व के नाइकपाड़ा निवासी अन्वर खुज्जादीन कुरुश ने अपनी मोटर साइकिल अपनी दुकान के सामने ख़डी किया था। मौके का फायदा उठाकर अज्ञात चोर 9 मार्च को मोटरसाइकिल चोरी कर फरार हो गए थे। पुलिस अज्ञात चोरों के खिलाफ विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर आगे की कार्रवाई में जुटी थी।

## 5 मोटरसाइकिल सहित एक ऑटोरिक्शा जब्त



CS CamScanner

दैनिक
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
# मुंबई केसरी टाइम्स
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १७ अंक : ३१३ बुधवार २० मार्च २०२४ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 08

# वालीव पुलिस की गिरफ्त में आये धोखाधड़ी के २ शातिर अभियुक्त , माल जप्त

**वसई.** वालीव पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा की टीम ने धोखाधड़ी की गुत्थी सुलझाने में कामयाबी हासिल की है। दरअसल, व्यापारियों का विश्वास हासिल कर उनसे स्टेशनरी का सामान मंगवाकर खरीदे गए सामान का भुगतान किए बिना आर्थिक धोखाधड़ी करने वाले २ अभियुक्तों को टीम ने गिरफतार किया है। इनके पास से टीम ने ६ लाख से अधिक का माल जप्त करते हुये २ अपराध का खुलासा किया है। यह कार्रवाई डीसीपी पौर्णीमा चौघुले-श्रृंगी व एसीपी उमेश माने-पाटील के मार्गदर्शन में वालीव पुलिस स्टेशन के सीनियर पुलिस निरीक्षक जयराज रणवरे व पुलिस निरीक्षक (अपराध) जिलानी सय्यद के नेतृत्व में अपराध जांच शाखा के एपीआई सचिन सानप की टीम ने की है।पुलिस अधिकारी ने कहा कि.शिकायतकर्ता अब्दुल्ला मोहम्मद यूसुफ शेख ब्राइट फाइलिंग सॉल्यूशन मैन्युफैक्चरिंग नामक एक कार्यालय स्टेशनरी निर्माण कंपनी का मालिक है।अभियुक्त ने शिकायतकर्ता उपरोक्त कंपनी को शिकायतकर्ता से दिनांक २२ फरवरी २०२४ एवं दिनांक २४ फरवरी २०२४ को दो



चरणों में बॉक्स फाइल का ऑर्डर कुल १८६८ बॉक्स फाइल, ३०० स्प्रिंग फाइल.ऐसी कुल १ लाख ४८ हजार ७७०/- रूपये की स्टेशनरी खरीदी गई।लेकिन, शिकायतकर्ता-अभियुक्त ने माल की राशि का भुगतान उत्तर-दिनांकित चेक के माध्यम से करने का वादा किया, और शिकायतकर्ता को गैर-नकद लेकिन उत्तर-दिनांकित चेक जारी किए।इसलिए, शिकायतकर्ता ने आरोपी पर विश्वास किया और कुल १८६८ बॉक्स फाइलें और ३०० स्प्रिंग फाइले अभियुक्त को दीं.कुल १ लाख ४८ हजार ७७०/- रूपये मूल्य के ऐसे स्टेशनरी सामान की आपूर्ति की गई।हालाँकि, अभियुक्त ने खरीदे गए सामान का भुगतान किए बिना सामान स्वीकार करके शिकायतकर्ता को आर्थिक रूप से धोखा दिया।तदनुसार, शिकायतकर्ता अब्दुल्ला मोहम्मद यूसुफ शेख द्वारा दी गई शिकायत पर,वालीव पुलिस स्टेशन धारा ४२० आईपीसी इसके तहत मामला दर्ज किया गया था।पुलिस अधिकारी ने कहा कि.उक्त अपराध की जांच के दौरान तकनीकी विश्लेषण के आधार पर भायंदर एवं मीरारोड क्षेत्र से अभियुक्तों के संबंध में जानकारी निकालकर उनकी तलाश की गई।वर्तमान अपराध मामले के संबंध में प्राप्त जानकारी और स्थापित तथ्यों के आधार पर आरोपी राजन ऊर्फ मनोज रामलाल सोनार (४३) व्यवसाय- स्टेशनरी आपूर्ति और तेजस सतीश पाटील (३१) व्यवसाय- स्टेशनरी आपूर्ति को हिरासत में लिया गया।पुलिस अधिकारी ने कहा कि.दोनों अभियुक्तों से की गई पूछताछ में.अभियुक्तों द्वारा ठगे गए माल में से कुछ माल अहमदाबाद राज्य गुजरात के शांतिलाल जैन को बेचा गया था।पुलिस टीम को सबसे पहले गुजरात राज्य के अहमदाबाद में भेजकर वारदात में शामिल आरोपी शांतिलाल जैन से वारदात की स्टेशनरी में प्रयुक्त सेलो टेप,बॉक्स फाइल और स्प्रिंग फाइल का सामान, कुल कीमत ६ लाख २८ हजार ७७० रुपए जब्त किए गए हैं।वालीव पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा को अभियुक्तों से दो मामले सुलझाने में सफलता मिली है।

CamScanner

राष्ट्रीय हिन्दी दैनिक
www.tarunmitra.in

# तरुणमित्र




श्रम ही आधार, खबरों से सरोकार

ठाणे- मुंबई से प्रकाशित

वर्ष - 17 ♦ अंक 94 ♦ बुधवार, 20 मार्च 2024 ♦ मूल्य : 2 ♦ पृष्ठ 8 महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार से प्रकाशित e-mail-tarun.thana@gmail.com

# वालीव पुलिस ने किया धोखाधड़ी का पर्दाफाश

- व्यापारियों का विश्वास हासिल कर उनसे स्टेशनरी का सामान मंगवाकर खरीदे गए सामान का भुगतान किए बिना आर्थिक धोखाधड़ी करने वाले 2 अभियुक्त गिरफ्तार।

## 6 लाख 28 हजार 770 रुपये का माल बरामद, दो मामले सुलझाए गए



तरुणमित्र अजहर शेख

**वसई।** वालीव पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा की टीम ने धोखाधड़ी की गुत्थी सुलझाने में कामयाबी हासिल की है। दरअसल, व्यापारियों का विश्वास हासिल कर उनसे स्टेशनरी का सामान मंगवाकर खरीदे गए सामान का भुगतान किए बिना आर्थिक धोखाधड़ी करने वाले 2 अभियुक्तों को टीम ने गिरफ्तार किया है। इनके पास से टीम ने 6 लाख से अधिक का माल जप्त करते हुये 2 अपराध का खुलासा किया है। यह कार्रवाई डीसीपी पौर्णिमा चौघुले-श्रृंगी व एसीपी उमेश माने-पाटील के मार्गदर्शन में वालीव पुलिस स्टेशन के सीनियर पुलिस निरीक्षक जयराज रणवरे व पुलिस निरीक्षक (अपराध) जिलानी सय्यद के नेतृत्व में अपराध जांच शाखा के एपीआई सचिन सानप की टीम ने की है। पुलिस अधिकारी ने कहा कि, शिकायतकर्ता अब्दुल्ला मोहम्मद यूसुफ शेख ब्राइट फाइलिंग सॉल्यूशन मैन्युफैक्चरिंग नामक एक कार्यालय स्टेशनरी निर्माण कंपनी का मालिक है।अभियुक्त ने शिकायतकर्ता उपरोक्त कंपनी को शिकायतकर्ता से दिनांक 22 फरवरी 2024 एवं दिनांक 24 फरवरी 2024 को दो चरणों में बॉक्स फाइल का ऑर्डर कुल 1868 बॉक्स फ़ाइल, 300 स्प्रिंग फ़ाइल, ऐसी कुल 1 लाख 48 हजार 770/- रूपये की स्टेशनरी खरीदी गई। लेकिन, शिकायतकर्ता-अभियुक्त ने माल की राशि का भुगतान उत्तर-दिनांकित चेक के माध्यम से करने का वादा किया, और शिकायतकर्ता को गैर-नकद लेकिन उत्तर-दिनांकित चेक जारी किए। इसलिए, शिकायतकर्ता ने आरोपी पर विश्वास किया और कुल 1868 बॉक्स फाइलें और 300 स्प्रिंग फ़ाइलें अभियुक्त को दीं, कुल 1 लाख 48 हजार 770/- रूपये मूल्य के ऐसे स्टेशनरी सामान की आपूर्ति की गई। हालांकि, अभियुक्त ने खरीदे गए सामान का भुगतान किए बिना सामान स्वीकार करके शिकायतकर्ता को आर्थिक रूप से धोखा दिया। तदनुसार, शिकायतकर्ता अब्दुल्ला मोहम्मद यूसुफ शेख द्वारा दी गई शिकायत पर, वालीव पुलिस स्टेशन धारा 420 आईपीसी इसके तहत मामला दर्ज किया गया था। पुलिस अधिकारी ने कहा कि, उक्त अपराध की जांच के दौरान तकनीकी विश्लेषण के आधार पर भायंदर एवं मीरारोड क्षेत्र से अभियुक्तों के संबंध में जानकारी निकालकर उनकी तलाश की गई। वर्तमान अपराध मामले के संबंध में प्राप्त जानकारी और स्थापित तथ्यों के आधार पर आरोपी राजन ऊर्फ मनोज रामलाल सोनार (43) व्यवसाय- स्टेशनरी आपूर्ति और तेजस सतीश पाटील (31) व्यवसाय- स्टेशनरी आपूर्ति को हिरासत में लिया गया। पुलिस अधिकारी ने कहा कि, दोनों अभियुक्तों से की गई पूछताछ में, अभियुक्तों द्वारा ठगे गए माल में से कुछ माल अहमदाबाद राज्य गुजरात के शांतिलाल जैन को बेचा गया था। पुलिस टीम को सबसे पहले गुजरात राज्य के अहमदाबाद में भेजकर वारदात में शामिल आरोपी शांतिलाल जैन से वारदात की स्टेशनरी में प्रयुक्त सेलो टेप, बॉक्स फाइल और स्प्रिंग फाइल का सामान, कुल कीमत 6 लाख 28 हजार 770 रुपए जब्त किए गए हैं। वालीव पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा को अभियुक्तों से दो मामले सुलझाने में सफलता मिली है।

CS CamScanner